यांत्रिक शेतीत 'फोर्स'ची आघाडी

फोर्स मोटर्स लि. ही भारतातील हलक्या व्यावसायिक वाहन श्रेणीतील एक अग्रेसर कंपनी आहे. मेटॅडोर, टंक्स, ट्रूव्हलर, बलवान ट्रॅक्टरला आज ग्राहकांची पहिली पसंती आहे. फोर्स मोटर्स लिमिटेड या कंपनीची स्थापना १९५८ मध्ये स्वातंत्र्यसेनानी, उद्योगमहर्षी आणि दानदूर विचारवंत (कै.) श्री. नवलमल फिरोदिया यांनी केली. (कै.) श्री. फिरोदिया यांनी प्रवासी आणि मालवाहतुकीसाठी दोन वैशिष्ट्यपूर्ण वाहने तयार करून देशातील वाहन उद्योगामध्ये वेगळी ओळख निर्माण केली आहे. यामधील महत्त्वाचे वाहन म्हणजे 'ऑटोरिक्षा' हे नावही त्यांनी स्वत:च ठेवलं आणि दुसरं वाहन म्हणजे टेंपो.

आज टेंपो, मेटॅडोर, ट्रॅक्स, ट्रूव्हलर आणि बलवान ट्रॅक्टरला ग्राहकांची पहिली पसंती आहे. फोर्स मोटर्सला प्रगतीकडे नेण्याचे श्रेय तरुण आणि तडफदार नेतृत्त्व असणारे व्यवस्थापकीय संचालक श्री. प्रसन फिरोदिया यांच्याकडे जाते. जे (कै.) नवलमल फिरोदिया यांचे नातू आहेत. फोर्स मोटर्स लि. ने लहान व्यावसायिक वाहने (SCV), बहुउपयोगी वाहने (MUV), हलकी व्यापारी वाहने (LCV), शेतीकामासाठी लागणाऱ्या ट्रॅक्टर्सची निर्मिती केली आहे.

सकाळ अॅग्रोवन सरपंच महापरिषदेला सातव्या वर्षातील पदार्पणानिमित्त माझ्या शुभेच्छा ! सकाळ अॅग्रोवन सरपंच महापरिषदेने सुरू केलेल्या या अभियानामुळे तरुण, सुशिक्षित सरपंचांना एकत्रित आणून शेतीविषयी व अर्थव्यवस्थेविषयी वेगवेगळ्या क्षेत्रांतील तज्ज्ञांशी संवाद घडविण्याचा प्रयोग दूरदर्शी व मूलभूत उपयुक्ततेचा आहे.

– डॉ. अभय फिरोदिया,
अध्यक्ष, फोर्स मोटर्स लि.

फिरोदिया समूहाने रिव्ह्यूलीस इरिगेशन या ठिबक सिंचन क्षेत्रातील जागतिक दर्जाच्या कंपनीमध्ये गुंतवणूक केली आहे. अमेरिका आणि इतर अनेक देशांमध्ये अग्रगण्य असलेली ही कंपनी भारतीय बाजारपेठेमध्येही कार्यरत आहे. या माध्यमातून फिरोदिया समूह संगणकीकृत सूक्ष्म मॅपिंग सारख्या अत्याधुनिक सुविधांसह, सांडपाणी प्रक्रिया आणि ठिबक सिंचन इत्यादी सुविधा पुरविणारा आहे. ते तंत्रज्ञान छोटे शेतकरी तसेच पडीक जमिनींसाठी उपयुक्त ठरणार आहे.

फोर्स मोटर्समध्ये अत्याधुनिक संशोधन आणि विकास केंद्रामध्ये अत्याधुनिक कॅड/कॅम सेंटर चाचणी उपकरणे, विविध सुविधा तसेच अत्याधुनिक टूलरुम आहे. कंपनीने डॅमलर, झेड. एफ. बॉश या कंपन्यांच्या सहकार्याने डिझाईन, उत्पादकता आणि विकास इत्यादी विविध क्षेत्रांत प्रगती केली आहे. फोर्स मोटर्सची उत्कृष्ट तांत्रिक क्षमता घेऊन सन १९९९ मध्ये डॅमल कंपनीने मर्सिडीस कारसाठी लागणाऱ्या इंजिन आणि गिअर बॉक्स उत्पादन करण्यासाठी प्रकल्प उभारणीची विनंती केली. आजमितीस मर्सिडीस कारला लागणाऱ्या २१,००० पेक्षा अधिक इंजिनचे तांत्रिक परीक्षण फोर्स मोटर्सने केले आहे. मर्सिडीसच्या आलिशान ई आणि सी श्रेणीतील कारसाठी लागणारे फ्रंट आणि रिअर ॲक्सल्सचे उत्पादन करण्याची अतिरिक्त जबाबदारी सोपविली आहे. प्रख्यात युरोपियन ऑटोमोबाईल कंपनी बी. एम. डब्ल्यूने आपल्या उच्चश्रेणीतील कार व एसयूव्ही गाड्यांसाठी लागणाऱ्या इंजिनचे उत्पादन करण्यासाठी फोर्स मोटर्सची निवड केली.

फोर्स मोटर्सच्या अत्याधुनिक ट्रॅक्टर प्रकल्पाची उत्पादनक्षमता २४,००० ट्रॅक्टर प्रति वर्ष आहे. बलवान ट्रॅक्टरमध्ये अत्याधुनिक हायड्रॉलिक्सचा उपयोग केला आहे. बलवान ट्रॅक्टर नांगरणी, पेरणी, मशागत, वाहतूक, कीडनाशक फवारणी, हार्वेस्टरसाठी उपयुक्त आहे. शेतजमिनीची समान पातळीवर नांगरणी होते. पेरणी यंत्राने पेरणी करतेवेळी, बियाणे समान पातळीवर पेरण्यासाठी पोझिशन कंट्रोल ही यंत्रणा बलवान व ऑक्स ट्रॅक्टरमध्ये आहे. बलवान ट्रॅक्टरमधील सिंक्रोमेश गिअरबॉक्समुळे ट्रॅक्टर ट्रॉलीचा भार किंवा मालवाहतुकीच्या कामात मोठी सोय होते. बलवान ट्रॅक्टरमध्ये डिझेलच्या बचतीबरोबर, उत्पादन क्षमतेत वाढ असा दुहेरी फायदा मिळतो. ड्युअल क्लच-पीटीओ संचलित उपकरणांसाठी सर्वोत्तम आहे. पॉवर स्टेअरिंगमुळे कमी श्रमात आरामदायी काम होते.

सिएट आयुष्यमान ट्रॅक्टर टायर

सिएट आयुष्यमान हा प्रीमियम श्रेणीतला ट्रॅक्टरच्या पुढील व मागील चाकांसाठी बनवलेला टायर आहे. आयुष्यमान ट्रॅक्टर टायरमध्ये बटन सखोल असल्यामुळे हा टायर अधिक काळ चालतो. टायरची ग्रीप शेतीकामासाठी उत्कृष्ट प्रतीची आहे. आयुष्यमान टायर हा सर्वोत्तम रबर कंपाउंड वापरून बनवला आहे. त्यामुळे पंक्चर आणि कट्सचे प्रमाण कमीत कमी आहे. शेतकऱ्यांना मदतीचा हात म्हणून टायरवर अनकंडीशनल वॉरंटी दिली आहे. या वॉरंटी अंतर्गत टायरला आरपार कट लागून टायर खराब झाल्यास, कंपनी टायर बदलून देईल. फक्त टायर हा तीन वर्षांच्या आत बनवलेला पाहिजे आणि टायरची झीज ५० टक्क्यांपेक्षा कमी असेल. असा टायर जेवढी झीज झाली असेल, तेवढे पैसे भरून बदलून मिळेल. हा एक प्रकारचा विमाच आहे.

FORCE MOTORS | BALWAN & Orchard TRACTORS PRESENTS
सकाळ अॅग्रोवन | ७वी सरपंच महापरिषद २०१८ • पुणे (आळंदी)
प्रायोजक | महायोग

पीक उत्पादन, गुणवत्ता वाढविणारे महाधन स्मार्टेक

नरेश देशमुख

दीपक फर्टिलायझर्स अॅन्ड पेट्रोकेमिकल्स लि. या मूळ कंपनीची शंभर टक्के उपकंपनी असलेली स्मार्टेकम टेक्नॉलॉजीज लिमिटेड या कंपनीने महाधन स्मार्टेक हे खत नुकतेच बाजारात आणले आहे. शेतमालाची गुणवत्ता आणि शेतकऱ्यांचा एकरी नफा वाढविण्यासाठी हे खत विकसित करण्यात आले आहे. या खतामुळे जास्त प्रमाणात अन्नद्रव्यांचा वापर होऊन पिकाचे दर्जेदार उत्पादन मिळणार आहे. या खताचे फायदे म्हणजे, अन्नद्रव्यांचा ऱ्हास कमी होऊन पिकास त्यांची उपलब्धता वाढते. पिकाचे १० ते १५ टक्के उत्पादन वाढते. अन्नद्रव्यांचे कार्यक्षम शोषण होते. जमिनीतील उपयुक्त जिवाणूंची वाढ होते. बीजांकूरण चांगले होऊन रोपे चांगली वाढतात. मुळांचा चांगला विकास होतो. पीकअवर्षण परिस्थिती तग धरते.

सध्या महाधन स्मार्टेक हे १०:२६:२६ या ग्रेडमध्ये उपलब्ध आहे. कांदा, ऊस, टोमॅटो या पिकांसाठी मध्य महाराष्ट्र, गुजरात, कर्नाटक राज्यांमध्ये या खताचे विपणन सुरू झाले आहे. येत्या काळात स्मार्टेकचे १२:३२:१६ आणि २०:२०:०:१३ या ग्रेडस उपलब्ध होत आहेत. येत्या खरीप हंगामापासून ही सर्व खते उपलब्ध होतील, असे कंपनीचे नियोजन आहे.

देशातील आघाडीची खत उत्पादक स्मार्टेकम टेक्नॉलॉजीज लिमिटेड या कंपनीने अलीकडे खत उत्पादन क्षमता तीन लाख टनांवरून आठ लाख टनांपर्यंत वाढविली आहे. कंपनीचा महाधन हा प्रमुख ब्रँन्ड गुणवत्ता आणि विश्वासासाठी ओळखला जातो. महाधन स्मार्टेकच्या प्रवेशाने खत उद्योग क्षेत्रामध्ये एक नवीन क्रांती पर्व सुरू झाले आहे. स्मार्टेकम टेक्नॉलॉजीज कंपनी खत आणि टेक्निकल अमोनियम नायट्रेट(टीएएन) हे दोन व्यवसाय हाताळते. दीपक फर्टिलायझर्सची उत्पादने जागतिक पातळीवर उच्च दर्जाची असून वेगवेगळ्या उद्योग क्षेत्रामध्ये त्यांच्या ब्रँडला पसंती आहे.

– **नरेश देशमुख,** व्हाइस प्रेसिडेंट, (मार्केटिंग अॅन्ड स्ट्रेटिजी)
स्मार्टेकम टेक्नॉलॉजीज लिमिटेड

रोजगारासोबत पायाभूत सुविधांच्या निर्मितीवर भर

जयकुमार रावल, मंत्री, रोहयो आणि पर्यटन

राज्यात मनरेगा योजनेसाठी केंद्र आणि राज्य शासनाकडून २०१४-१५ पासून निधी उपलब्धतेमध्ये सातत्याने भरीव वाढ करण्यात आली. महाराष्ट्रात या योजनेतून २०१६-१७ मध्ये २,०९० कोटी रुपयांची कामे करण्यात आली. राज्यात मनरेगातून २०१६-१७ मध्ये १ लाख ५० हजार इतकी पायाभूत सुविधा निर्मितीची कामे करण्यात आली. २०१७-१८ या चालू वर्षात मनरेगासाठी केंद्र आणि राज्य शासनाकडून तीन हजार कोटी रुपयांचा भरीव निधी उपलब्ध आहे.

समृद्ध महाराष्ट्र जनकल्याण योजना :

राज्याची सामाजिक, आर्थिक, कृषीविषयक स्थिती आणि गरजा लक्षात घेऊन सुरू करण्यात आलेली ही योजना ११ कलमी कार्यक्रमाच्या स्वरूपात राबविण्यात येत आहे. अहिल्यादेवी सिंचन विहीर, अंकूर रोपवाटिका, निर्मल शोषखड्डा, कल्पवृक्ष फळबाग लागवड, भू-संजीवनी व्हर्मी कंपोस्टींग, समृद्ध ग्राम योजना, अमृतकुंड शेततळे, भू-संजीवनी नाडेप कंपोस्टींग, निर्मल शौचालय, समृद्ध गाव तलाव, नंदनवन वृक्ष लागवड या योजना अकरा कलमी कार्यक्रमातून राबविण्यात येत आहेत.

लाभार्थ्यांच्या बँक खात्यात थेट अनुदान

मनरेगामधील वैयक्तिक लाभाच्या योजनांसाठीचे अनुदान लाभार्थ्यांच्या थेट बँक खात्यात जमा करण्याचा निर्णय रोजगार हमी विभागामार्फत गेल्यावर्षी घेण्यात आला. या निर्णयामुळे लाभार्थी त्यांना लागणारे साहित्य स्वत: टीन नंबर असणाऱ्या दुकानदारांकडून खरेदी करू शकणार असल्याने कामांना वेग आला. सिंचन विहीर, शेततळे, फळबाग लागवड, शौचालय, शोषखड्डे इत्यादी वैयक्तिक लाभाच्या योजना रोहयो विभागामार्फत राबविण्यात येतात. यासाठीचे सिमेंट, वीट, वाळू, स्टील इत्यादी साहित्य खरेदीसाठीचे अनुदान लाभार्थ्यांना थेट त्यांच्या खात्यावर देण्यात येत आहे.

आठ कोटी रोपांची निर्मिती

मनरेगामधून कल्पवृक्ष फळबाग योजनेअंतर्गत १ लाख ११ हजार १११ कामांचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले असून ५३ हजार ४०७ कामे चालू व पूर्ण अवस्थेत आहेत. चार कोटी वृक्ष लागवड या महत्त्वाकांक्षी कार्यक्रमासाठी मनरेगा योजनेतील अंकूर रोपवाटिकांमधून मोठ्या प्रमाणावर रोपांचे वाटप करण्यात आले आहे. यामध्ये आतापर्यंत ७ कोटी ४१ लाख ६० हजार रोपांची निर्मिती झाली आहे.

अडीचाळीस हजार अमृतकुंड शेततळी पूर्ण :

रोहयोमार्फत मागेल त्याला शेततळे ही अत्यंत महत्त्वाकांक्षी योजना राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत १ लाख ११ हजार १११ शेततळ्यांचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले. यापैकी ४८ हजार ४१३ शेततळ्यांची कामे पूर्ण झाली असून ७ हजार ८७७ शेततळ्यांची कामे सुरू आहेत. या योजनेसाठी यावर्षी १०० कोटी रुपयांचे अनुदान अर्थसंकल्पित करण्यात आले आहे. यापुढील काळातही राज्यात ही योजना प्रभावीपण राबविली जाणार आहे.

'मागेल त्याला शेततळे' योजनेला विविध पुरस्कार :

देशातून पंतप्रधान पुरस्कारासाठी दहा उत्कृष्ट नावीन्यपूर्ण योजनांची निवड करण्यात आली होती. त्यात महाराष्ट्रातून 'मागेल त्याला शेततळे' योजनेचा समावेश सर्वोत्कृष्ट योजना म्हणून करण्यात आला. या योजनेच्या ऑनलाईन ऑप्लिकेशन मॉडेलला 'स्कॉच अॅवॉर्ड प्लॅटीनम' हा पुरस्कार प्राप्त झाला आहे.

सव्वादोन लाख हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार

समृद्ध महाराष्ट्र जनकल्याण योजनेअंतर्गत अहिल्यादेवी सिंचन विहीर योजना राबविण्यात येत असून त्यासाठी १ लाख ११ हजार १११ विहिरींच्या बांधकामाचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले. त्यापैकी १ लाख ८ हजार ९३८ कामे पूर्ण व चालू अवस्थेत आहेत. एका सिंचन विहिरीतून सुमारे दोन हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येते. त्यामुळे सिंचन विहिरीसाठी राबविण्यात आलेल्या या योजनेच्या माध्यमातून राज्यातील सुमारे २ लाख २५ हजार हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे. चालू वर्षात हे उद्दिष्ट पूर्ण करण्याचा प्रयत्न आहे.

कृषी पर्यटनाला देणार बळ

ग्रामीण पर्यटनाला चालना देण्याच्या दृष्टीने राज्य शासनाच्या पर्यटन विभागामार्फत राज्याचे स्वतंत्र कृषी पर्यटन धोरण जाहीर करण्यात आले. या धोरणात समाविष्ट करण्यात आलेल्या विविध बाबींची येत्या काळात अंमलबजावणी करून ग्रामीण पर्यटन, रोजगार आणि अर्थव्यवस्थेला मोठी चालना देण्यात येईल. विशेषत: कृषी पर्यटनाला शेतीपूरक व्यवसायाचा दर्जा, कृषी पर्यटन केंद्रांना कृषी विभागाच्या सर्व योजना प्राधान्याने देण्याचा विचार, घरपट्टी, पाणी पट्टी आणि वीज व्यापारी दराने न देता शेतीच्या दराने पुरवणे तसेच लांबलचक परवानग्यांच्या झंझाटातून मुक्त करण्याचे राज्य सरकारचे धोरण आहे. या नव्या धोरणाची प्रभावीपणे अंमलबजावणी करून ग्रामीण भागात कृषी पर्यटनाची चळवळ अधिक बळकट करण्याचा प्रयत्न आहे.

जातिवंत पशू संगोपन, प्रक्रिया उद्योगाला प्राधान्य

शेतीपूरक व्यवसाय अधिक फायदेशीर व्हावा, यासाठी विविध योजना पशुसंवर्धन विभागाकडून राबविल्या जात आहेत. याबाबत राज्याचे पशुसंवर्धन आयुक्त कांतिलाल उमाप यांच्याशी केलेली बातचीत...

गणेश कोरे

राज्यात पशुधन घटत आहे, नेमके वास्तव काय आहे ?

२०१२ मध्ये झालेल्या एकोणिसाव्या पशुगणनेनुसार राज्यात सुमारे १ कोटी ५४ लाख गायी, ५५ लाख म्हशी, ८५ लाख शेळ्या तर २५ लाख मेंढ्या आहेत. कुक्कुट पक्षी सुमारे ७ कोटी ७८ लाखांच्या आसपास आहेत. आनुवंशिक सुधारणा कार्यक्रम, विविध घटकांसाठी असणाऱ्या नावीन्यपूर्ण योजना, चारा निर्मितीच्या योजनांमुळे पशुधनाची संख्या स्थिरावली आहे. विसाव्या पशुगणनेत संख्या वाढल्याचे नक्की दिसेल.

विसावी पशुगणना रखडली आहे. याची काय कारणे आहेत ?

यंदाची पशुगणना टॅबद्वारे करण्याचा निर्णय केंद्र शासनाने घेतला आहे. पशुसंवर्धन विभागाचे भविष्यातील धोरण ठरविण्यासाठी अचूक आकडेवारी याद्वारे उपलब्ध होणार आहे. या पशुगणनेसाठी सुमारे ७ हजार २०० टॅब खरेदीची प्रक्रिया सुरू आहे. केंद्र शासनाच्या ई मार्केटिंगच्या पोर्टलद्वारे टॅबची खरेदी प्रक्रिया सुरू आहे.

भविष्यात पशुधन घटू नये म्हणून शासन कोणते धोरण अवलंबणार आहे ?

पशुधन वाढीबरोबरच पशुधनाची उत्पादकतावाढीचे शासनाने धोरण आहे.

कांतिलाल उमाप

यासाठी गायी बरोबरच शेळी- मेंढ्यांचा आनुवंशिक सुधारणा कार्यक्रम हाती घेतला आहे. १०० टक्के कृत्रीम रेतनावर भर आहे.

कृत्रिम रेतनाची सद्य:स्थिती काय आहे ?

आम्ही ६० लाख गायींना कृत्रीम रेतन करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. यापैकी पशुसंवर्धन आयुक्तालयाद्वारे १८ लाख पशुधनाचे कृत्रीम रेतन झाले, तर खासगी आणि सहकारी क्षेत्राकडून १० लाखांपेक्षा जास्त पशुधनाचे कृत्रीम रेतन झाले आहे. आणखी तीन महिन्यांमध्ये ५४ लाखांपर्यंतचा टप्पा पार होईल. सद्यस्थितीत कृत्रीम रेतनामध्ये महाराष्ट्र आघाडीवर आहे.

प्रक्रिया उद्योगांना प्रोत्साहन देण्यासाठी कोणते धोरण आहे ?

सध्या बहुतांश शेतकऱ्यांचे गोठे आधुनिक होत आहेत. यासाठी शासनाने विविध योजना राबविल्या आहेत. शेळी-मेंढीपालनाच्या विस्तारासाठी राष्ट्रीय कृषी विकास योजनेअंतर्गत २० शेळ्या, ४० शेळ्या गटांची योजना राबवित आहोत.

मटण निर्यातीसाठी कोणते प्रयत्न आहेत ?

शेळी, मेंढीपालनासोबत मटण प्रक्रिया उद्योगासाठी शेतकरी कंपन्यांना प्राधान्य देण्याचे ठरविले आहे. यासाठीची योजना प्रस्तावित असून, पी.पी.पी. तत्त्वावर चंद्रपुर, वर्धा, अमरावती, जालना, नगर, सातारा, रत्नागिरी या सात जिल्ह्यांमध्ये प्रायोगिक तत्त्वावर योजना राबविणार आहोत. यासाठीचा प्रस्ताव शासनाला पाठविला आहे.

मराठवाडा, विदर्भात पूरक व्यवसायासाठी कोणत्या योजना आहेत ?

मराठवाडा-विदर्भ पॅकेज अंतर्गत ४९० कोटींचा प्रकल्प ११ जिल्ह्यांतील ३ हजार २३ गावांमध्ये राबविण्यात येत आहे. या प्रकल्पाअंतर्गत सध्या रोज १ लाख ९० हजार लिटर दूध संकलन होत आहे. हे संकलन सहा लाख लिटरपर्यंत वाढविण्याचे उद्दीष्ट आहे. दूध संकलनाचे सातत्य निर्माण झाल्यानंतर गावांच्यामध्ये प्रक्रिया उद्योग उभारण्यात येतील. शेतकरी उत्पादक कंपन्यांना प्राधान्य देण्यात येणार आहे.

कृषिकेंद्रित ग्रामविकासासाठी सरपंचाने 'लीडर' व्हावे

राज्याचे कृषी आयुक्त सच्चिंद्र प्रताप सिंह यांनी कृषी विभागाच्या योजना प्रत्येक गावात आणि सामान्य शेतकऱ्यांपर्यंत जाण्यासाठी विविध उपक्रमांवर भर दिला आहे. अॅग्रोवन सरपंच महापरिषदेच्या निमित्ताने सच्चिंद्र प्रताप सिंह यांच्याशी साधलेला संवाद...

मनोज कापडे

कृषी आयुक्त म्हणून तुम्ही ग्रामपंचायतींना काय संदेश द्याल ?

गावाचा विकास म्हणजे ग्रामविकास आणि कृषी विकास असे मी मानतो. ग्रामपंचायतीचे लाभार्थी ९० टक्के हे शेतकरीच आहेत. मात्र, बहुतेक ग्रामपंचायतींची कामे अजूनही कृषिकेंद्रित झालेली नाहीत. जिल्हा परिषदेत कृषी कामकाजाचा आढावा घेणारी समिती आहे. तालुका पंचायत समितीतदेखील कृषी कामाचा आढावा घेतला जातो. मग, गावपातळीवर ग्रामपंचायतीमध्ये कृषीविषयक कामकाजाची समिती का नको ? अर्थात असा प्रश्न सरपंच मंडळींनी उपस्थित करायला हवा. हा प्रश्न सुटण्यासाठी स्वत: सरपंचांनी पाठपुरावादेखील करायला हवा. ग्रामपंचायतींनी आता ग्रामविकासाच्या योजनांबरोबरच कृषी ज्ञान, माहिती आणि तंत्राचा विस्तार करण्यासाठी पुढे येण्याची गरज आहे.

सच्चिंद्र प्रताप सिंह

कृषिविषयक कामकाजात सरपंच कशा पद्धतीने पुढाकार घेऊ शकतील ?

गावशिवारातील ग्रामविकास किंवा कृषी विषयक कामांसाठी अनेक वेळा सरपंचांकडून जिल्हा परिषदा, पंचायत समित्या किंवा इतर शासकीय कार्यालयांमध्ये भेटी दिल्या जातात. माझा आग्रह असा आहे की, सरपंचांनी शेतकरी आणि शेतीविषयक योजनांचादेखील पाठपुरावा करावा. त्यासाठी तालुका कृषी अधिकारी किंवा जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालयांमध्येदेखील सतत जावे. कृषी सहायक गावात येत नसल्यास सामान्य शेतकरी कृषी कार्यालयाला कळवू शकत नाही. मात्र, सरपंच हे काम करू शकतो.

विस्तार कामांमध्ये ग्रामपंचायतींचा प्रत्यक्ष सहभाग कसा घेता येईल ?

गाव आणि त्याभागातील कृषी कार्यालये, कृषी विज्ञान केंद्रे, कृषी विद्यापीठे यांची सांगड ग्रामपंचायती घालू शकतात. गावच्या शेतीला किंवा शेतकऱ्यांना नेमका कोठून कसा लाभ मिळू शकतो, याविषयी ग्रामपंचायतीकडून शेतकऱ्यांना मार्गदर्शन मिळू शकते. गावात कृषी विभागाची पीक प्रात्यक्षिके कशी वाढतील, नव्या प्रयोगांना चालना कशी मिळेल, खते-बियाणे-कीटकनाशके यांची उपलब्धता कशी वाढेल, शेतकरी गट कसे तयार होतील, या गटांची पुन्हा कंपनी कशी तयार होईल, अशा कितीतरी बाबी ग्रामपंचायतींना करता येतील.

कृषिकेंद्रित गाव घडविण्यासाठी सरपंचाने 'लीडर' म्हणून काम केले पाहिजे. कृषी विभागाच्या विविध योजना गावशिवारात आणण्यासाठी पुढाकार घेतला तर गावाला कृषी केंद्रित आर्थिक सबलता मिळेल.

ग्रामपंचायतींमध्ये कृषी विभागाचा कर्मचारी जावा यासाठी नेमके काय प्रयत्न अपेक्षित आहेत ?

राज्यातील प्रत्येक ग्रामपंचायतीने कृषी विभागाचे महत्त्व ओळखून कृषी विभागाच्या कर्मचाऱ्याला म्हणजेच कृषी सहायकाला ग्रामपंचायतीत बसण्यासाठी जागा उपलब्ध करून द्यावी. कृषी सहायकांकडे विविध योजनांची माहिती असते. ग्रामपंचायतीतून या योजनांचा प्रसार झपाट्याने होऊ शकतो. सरपंचांनी ग्रामपंचायतीत एक कृषी कक्ष सुरू करण्यासाठी प्रयत्न करावेत.